**मालेगाव महानगरपालिका, मालेगाव**

**जाहीर आवाहन** क्रं. ६६

**अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना (रमाई आवास योजना)**

मालेगाव शहरातील नागरीकांना जाहीर आवाहन करण्यात येते की, म.शासन निर्णय अन्वये मालेगाव म.न.पा.क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकासाठी रमाई आवास योजना मालेगाव महानगरपालिका मार्फ़त मालेगाव शहरात राबविण्यात येत आहे. म. शासनाकडुन यापुर्वी प्राप्त उद्दिष्टांपैकी ३४७ लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आली असुन मंजुर लाभार्थ्यांपैकी बांधकाम परवानगी सादर करणा-या लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम प्रगतीच्या आधारावर योजनेच्या मार्गदर्शक सुचनानुसार टप्पेनिहाय अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील व्यक्ती/कुटूंबासाठी रमाई आवास योजनेकरीता मालेगाव महानगरपालिकेसाठी शासनाने नविन घरकुले मंजुर केलेली आहे. तरी मालेगाव शहरातील अनुसूचित जाती नवबौध्द घटकांतील नागरीकांना जाहिर आवाहन करण्यात येते की, शासन निर्णयानुसार पात्र असलेल्या नागरीकांनी १५ दिवसांच्या आत मालेगाव महानगरपालिकेस विहित नमुन्यात अर्ज सादर करावे.

**अर्ज सादर करावयासाठी आवश्यक कागदपत्रे**

१) अर्जदाराच्या नावे महानगरपालिका हद्दीत जागा असलेला ७/१२ किंवा सिटी सर्व्हे उतारा
२) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील असलेबाबतचा सक्षम प्राधिकरणाकडुन जातीचा दाखला
३) रेशनकार्ड
४) रेशनकार्डवरील सर्व सदस्यांचे आधारकार्ड
५) मतदान कार्ड
६) बँक पासबुक
७) रहिवाशी दाखला (तहसीलदार यांचा)
८) सक्षम प्राधिकरणाकडुन उत्पन्न दाखला ( अधिकतम ०३ लक्ष मर्यादा)
९) पक्के घर नसल्याबाबतचे रु.१०० स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र
१०) महिला लाभार्थी असल्यास नावात बदल असलेबाबतचे रु.१०० स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र
११) १ फ़ोटो
१२) घरपट्टी/ लाईटबील/ पाणीपट्टी यापैकी एक

**टिप – लाभार्थ्यास मंजुरी मिळाल्यानंतर बांधकाम परवानगी सादर करणे बंधनकारक असेल**

वरील आवश्यक कागदपत्रांसह नागरीकांनी तात्काळ १५ दिवसांच्या आत महानगरपालिकेस विहित नमुन्यात अर्ज सादर करावे. योजनेच्या अधिक माहितीसाठी महानगरपालिकेच्या रमाई आवास योजना कक्ष येथे सुटीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत संपर्क करु शकतात याची सर्व नागरीकांनी नोंद घावी.

**आयुक्त तथा प्रशासक**
मालेगाव महानगरपालिका,मालेगाव

जा.क्र.मामनपा/IHSDP/ ८७/२०२५
दिनांक :- 6 / 5 /२०२५

**प्रति,**

मा.संपादक -----------------------

वरील प्रेसनोट आपल्या वर्तमानपत्रात प्रसिध्दीसाठी देण्यात येत असुन सदरची जाहीर आवाहन एक वेळेस दि.०८/ ०५ /२०२५ पर्यंत किंवा तत्पुर्वी बिनचुक प्रसिध्द करावी. वरील ~~प्रेसनोट/माहिती~~/ जाहीर आवाहन बातमी स्वरुपात नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात जनहितार्थ विनामुल्य प्रसिध्द करुन मालेगाव महानगरपालिकेस सहकार्य करावे.

**जनसंपर्क अधिकारी**
मालेगाव महानगरपालिका,मालेगाव

**प्रत** :- उपमाहिती कार्यालय मालेगाव .